## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (एक)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण  विभागाच्या कार्यालयातील कार्य व कर्तव्य यांचा तपशील.

1. कार्यालयाचे नाव :- जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद , परभणी.
2. पत्ता :- स्टेडीयम जवळ , परभणी.
3. कार्यालयाचे प्रमुख :- जिल्हा समाज कल्याण अधिकारी
4. शासकीय विभागाचे नाव :- सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग , महाराष्ट्र शासन.
5. कोणत्या मंत्रालयाती खात्याच्या अधिनीस्त :- सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, महाराष्ट्र शासन.
6. कार्यक्षेत्र-जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्र भौगोलीक :- कार्यानुरुप
7. विशिष्ट कार्य :- मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी  योजना राबविणे
8. विभागाचे ध्येयधोरण :- मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी  योजना राबविणे
9. सर्व संबंधित कर्मचारी :- एकुण वर्ग 1 :- 1 अधिकारी

   एकुण वर्ग 3 :- 7 कर्मचारी
10. कार्य :- मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी  योजना राबविणे
11. कामाचे विस्तृत स्वरुप :- मागासवर्गीयांसाठी विविध कल्याणकारी  योजना राबविणे
12. कार्यालयाचा दुरध्वणी क्रं. व वेळा :-  कार्यालयाचा वेळ सकाळी 9.45 ते सायं. 06.15

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (दोन)**

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्या अधिकाराचा तपशिल.

**समाज कल्याण विभागा अंतर्गत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अधिकार प्रदान आदेशानुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना विविध अधिकार आहेत. वर्ग-3 यांना कोणतेही अधिकार नाहीत.**

*** जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे अधिकार व कर्तव्ये**

**आर्थिक अधिकार**

| अ.क्र. | पदनाम | आर्थिक अधिकार |
|---|---|---|
| 1 | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | आहरण व संवितरण अधिकारी , वेतन देयके मंजुर करणे तसेच कार्यालयीन खर्चाची देयके मंजुर करणे , वेतन व पुरवणी भत्याची देयके मंजुर करणे , इंधन देयक मंजुर करणे , लेखाशिर्ष 2225 अंतर्गत प्राप्त विविध योजनांच्या निधीचा योजनानिहाय खर्च करणे |

**प्रशासकीय अधिकारी**

| अ.क्र. | पदनाम | प्रशासकीय अधिकार |
|---|---|---|
| 1 | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | समाज कल्याण विभागांतर्गत वर्ग -3 व वर्ग - 4 कर्मचाऱ्यांची आस्थापनाविषयक कामे , समाज कल्याण समितीचे सचिव म्हणुन कामकाज पाहणे |

| अ.क्रं. | अधिका-यांचे पदनाम | कार्यरत अधिकरी | अधिकार व कर्तव्य |
|---|---|---|---|
| 1. | सहायक लेखाधिकारी | श्री.जी.आर.इंगळे | लेखाविषयक सनियंत्रण |
| 2. | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | श्री.पी.एम.लांडे | अपंग विभागातंर्गत येणारी सर्व कामे |
| 3. | समाज कल्याण निरीक्षक | श्री.आर.पी.काळे | शिष्यवृत्ती विभाग , वसतिगृह विभाग , तांडावस्ती सुधार योजना , वृध्द कलांवत मानधन योजना , विषय समिती बैठक |
| 4. | समाज कल्याण निरीक्षक | श्री.एच.ए.सय्यद | 20 % सेस , अनु. जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (द.व.सु.यो.) , अनु. जाती आश्रमशाळा योजना |
| 5. | वरिष्ठ लिपीक | श्री. व्ही.के. मस्के | आंतरजातिय विवाह प्रोत्साहनपर योजना , वसतिगृह शाखा , भांडार शाखा |
| 6. | कनिष्ट सहाययक लेखा | श्री. एस.पी. भाग्यवंत | लेखा विषयक कामे |
| 7. | कनिष्ट लिपीक | श्रीमती.ए.एस.जाधव | आस्थापना , माहिती अधिकार , बैठक , आपले सरकार पोर्टलवरील तक्रार निवारण , शिष्यवृत्ती व वसतिगृह शाखेस सहाय्यक |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (चार)

आपली कामे पार पाडण्यासाठी निश्चित केलेली प्रमाणके

**प्रत्येक कामाची कालमर्यादा :-**

सर्व प्रकारची तातडीची प्रकरणे विहीत कालावधीत निकाली काढावयाची प्रकरणे प्राधान्याने निकाली काढली जातात . तसेच इतर सर्व प्रकरणेही त्वरीत निकाली काढली जातात .

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (पाच)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयातील कामाशी संबंधित नियम / अधिनियम

1. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम 1961.
2. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता 1968.
3. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती आकस्मित खर्च अधिनियम 1968.
4. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम 1964.
5. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम 1967.
6. महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम 1967.
7. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981.
8. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती) नियम 1982.
9. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981.
10. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम 1981.
11. महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1968.
12. महाराष्ट्र कोषागार नियम 1968.

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (सहा)**

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयातील दस्तऐवजाची वर्गवारी

| अ.क्रं. | विषय | दस्तऐवजाचा प्रकार व वर्गवार | सुरक्षीत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| 1. | विविध विषयाच्या संबंधात शासनाचे स्थाई आदेश,शासन निर्णय,परिपत्रके इ. | नस्ती -अ | कायमस्वरुपी |
| 2. | नियम / अधिनीयम | पुस्तके u अ | कायमस्वरुपी |
| 3. | आवक / जावक नोदवही | रजिष्टर u अ | कायमस्वरुपी |
| 4. | लेखा परिक्षण आक्षेप अनुपालन | नस्ती- ब | 30 वर्ष |
| 5. | न्यायालयीत प्रकरणे | नस्ती u अ | कायमस्वरुपी |
| 7. | जि.प. सभेचे इतिवृत्त | रजिष्टर u अ | कायमस्वरुपी |
| 9. | जि.प. च्या सदस्य,पदाधिकारी निवडणूका संबंधित अभिलेखे | नस्ती u अ | कायमस्वरुपी |
| 10. | रजा | नस्ती u ब | 30 वर्ष |
| 11. | कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका | रजिष्टर u अ | कायमस्वरुपी |
| 13. | दौरा दैनंदिनी व संभाव्य दौरा कार्यक्रम | नस्ती u क-1 | 5 वर्ष |
| 14. | सेवा निवृत्ती लाभाची नस्ती | नस्ती u ब | 30 वर्ष |
| 15. | पात्र ठरलेले सेवा निवृत्ती प्रकरणे | नस्ती u क | 10 वर्ष |
| 16. | कर्मचा-याचे राजीनामे, सेवेतून काढून टाकणे इ. | नस्ती uक | 10 वर्ष |
| 17 | रजा लेखा, भ.नि.नि. अग्रीम | नस्ती u क -1 | 5 वर्ष |
| 18. | अंदाजपत्रकाची फाईल | नस्ती u ब | 30 वर्ष |
| 19. | निवृत्तीवेतन धारकाच्या मृत्यु संबंधिताची विवरणपत्र | नस्ती u क | 10 वर्ष |
| 20. | वेतन बिल ,वेतन पट | रजिस्टर u ब | 30 वर्ष |
| 22. | जमा रकमा व दिलेल्या रकमा यांची वर्गीकृत नोंदणी पुस्तके | रजिस्टर ब | 30 वर्ष |
| 23. | उपस्थिती पट, सरकारी खजिण्यात भरलेल्या बाबती पावती, दिलेले चलन, सामान व कंत्राटाची बिले | क | 10 वर्ष |

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (सात)**

**जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्याशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था.**

अशा प्रकारची व्यवस्था अस्तित्वात नाही.

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (आठ)**

**जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयाच्या समितीची यादी प्रकाशित करणे.**

| अ.क्रं. | समितीचे नाव | समिती सदस्य संख्या | सभाचे उद्दीष्ट | किती वेळा घेण्य येते | सभा जन सामान्यासाठ खुली आहे किंवा ना | सभेचा कार्यवृतां |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | समाज कल्याण समिती | निरंक | | | | |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख)(नऊ व दहा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण  विभागातील अधिकारी / कर्मचा-यांची नावे

| अ.क्रं. | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव | पदनाम | वर्ग | वेतन श्रेणी | दुरध्वणी/ भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | श्रीमती एस.के. भोजने | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | वर्ग-1 | | 8625948250 |
| 2 | श्री.जी.आर.इंगळे | सहायक लेखाधिकारी | वर्ग-3 | | 9860394092 |
| 3 | श्री.पी.एम.लांडे | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | वर्ग-3 | | 9953017909 |
| 4 | श्री. आर.पी.काळै | समाज कल्याण निरीक्षक | वर्ग-2 | | 9403949999 |
| 5 | श्री.एच.ए.सय्यद | समाज कल्याण निरीक्षक | वर्ग-3 | | 8208960067 |
| 6 | श्री. व्ही.के. मस्के | वरिष्ट लिपीक | वर्ग-3 | | 9689255122 |
| 8 | श्रीमती.ए.एस.जाधव | कनिष्ट लिपीक | वर्ग-3 | | 9421524007 |
| 8 | श्री.एस.व्ही.ठाकरे | कनिष्ठ सहाय्यक लेखा | वर्ग-3 | | 8408064007 |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख)(अकरा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागातील मंजुर अंदाजपत्रक व खर्चाचा तपशील याची विस्तृत माहिती.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | बाब | अखर्चित रक्कम (सन 2023-24 मधील) | प्राप्त अनुदान (सन 2024-25 मध्ये) | एकुण प्राप्त अनुदान | 03/02/25 अखेर खर्च | सन 2024-25 मधील 03/02/25अखेर खर्च | एकूण खर्च | शिल्लक तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | 2225 0539 | माध्यमिक शाळेतील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती | 762500 | 0 | 762500 | 687000 | 0 | 687000 | 75500 |
| 2 | 2225 0539 | शिक्षण फी परिक्षा फी | 1081000 | 0 | 1081000 | 0 | 0 | 0 | 1081000 |
| 3 | 2225 0539 | इयत्ता 5 वी ते 7 मधील मागासवर्गीय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती | 315200 | 0 | 315200 | 0 | 0 | 0 | 315200 |
| 4 | 2225 3046 | अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती | 5000 | 111000 | 116000 | 0 | 110000 | 110000 | 6000 |
| 5 | 2225 F245 | इयत्ता 5 वी ते 7 मधील इतर मागास प्रवर्गातील विदयार्थिनिंना सा बा फुले शिष्यवृत्ती | 1484000 | 0 | 1484000 | 1482500 | 0 | 1482500 | 1500 |
| 6 | 2225 F272 | इयत्ता 8 वी ते 10 मधील इतर मागास प्रवर्गातील विदयार्थिनिंना सा बा फुले शिष्यवृत्ती | 29508250 | 0 | 29508250 | 2034000 | 0 | 2034000 | 27474250 |
| 7 | 2225 E982 | इयत्ता 8 वी ते 10 मधील विजा भज विदयार्थिनिंना सा बा फुले शिष्यवृत्ती | 2773250 | 0 | 2773250 | 2772000 | 0 | 2772000 | 1250 |
| 8 | 2225 F183 | इतर मागासवर्गीय विदयर्थ्यांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 9 | 2225 E174 | इतर मागासवर्गीय विदयर्थ्यांना मॅट्रीकपुर्व शिष्यवृत्ती - केंद्र 50% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 10 | 2225 F209 | DNT प्रवर्गातील विदयर्थ्यांसाठी डॉ.आंबेडकर शिष्यवृत्ती -राज्य 25% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 11 | 2225 F192 | DNT प्रवर्गातील विदयर्थ्यांसाठी डॉ.आंबेडकर शिष्यवृत्ती -केंद्र 75% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 12 | 2225-F011 | माध्यमिक शाळेतील विजाभज/ विमाप्र प्रवर्गतील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती गुणवत्ता | 1000000 | 0 | 1000000 | 1000000 | 0 | 1000000 | 0 |
| 13 | 2225-F011 | माध्यमिक शाळेतील विजाभज/ विमाप्र प्रवर्गतील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती शिक्षण फी परीक्षा फी | 1000000 | 0 | 1000000 | 999945 | 0 | 999945 | 55 |
| 14 | 2225-F011 | माध्यमिक शाळेतील विजाभज/ विमाप्र प्रवर्गतील विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती सा.बा.फुले | 2563750 | 0 | 2563750 | 2563200 | 0 | 2563200 | 550 |
| 15 | 2225-F441 | इयत्ता 9 वी ते 10 मधील अनु जाती विदयार्थ्यांना भारत सराकार शिष्यवृत्ती | 1023000 | 176000 | 1199000 | 1023000 | 174000 | 1197000 | 2000 |
| 16 | 2225 E599 - NN210 014 | औदयोगीक प्रशिक्षण संस्थेतील विदयार्थ्यांना विदयावेतन | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| 17 | 2225 E599 - | अस्वच्छक व्यवसायातील पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | NN210 019 | | | | | | | | |
| 18 | 2225 E599 - NN210 009 | माध्यमिक शाळेतील अनु.जातीच्या विदयार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती | 210000 | 0 | 210000 | 0 | 0 | 0 | 210000 |
| 19 | 2225 E599 - NN210 011 | शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने | 270000 | 0 | 270000 | 194610 | 0 | 194610 | 75390 |
| 20 | 2225 E599 - NN210 021 | इयत्ता 5 वी ते 7 मधील विदयार्थिनिंना सा बा फुले शिष्यवृत्ती | 1200000 | 0 | 1200000 | 736200 | 0 | 736200 | 463800 |
| 21 | 2225 E599 - NN210 023 | इयत्ता 8 वी ते 10 मधील विदयार्थिनिंना सा बा फुले शिष्यवृत्ती | 6000000 | 0 | 6000000 | 2397000 | 0 | 2397000 | 3603000 |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (बारा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागातील अनुदान वाटपाच्या कार्यक्रमाची कार्यपध्दती

समाज कल्याण विभागामध्ये लाभार्थ्यांना अनुदान देण्याच्या योजनांची विस्तृत माहिती खालीलप्रमाणे

### 1.अनुसुचित जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे

योजनेचे स्वरूप

दलित वस्त्यामध्ये मुलभूत सुविधा जसे- पिण्याच्या पाण्याचा पुरवठा , सिमेंट रस्ते/ नाली बांधकाम , स्वच्छता विषयक सोयी , मलनिस्सारण , वीज , वस्तीला जोडणारे रस्ते , समाज मंदिर इ. व्यवस्था करुन दलित वस्तीची सर्वांगिण सुधारणा करण्यासंबंधी ही योजना आहे.

नियम, अटी व पात्रता इ

सदर काम मागासवर्गीय वस्ती मध्येच करणे आवश्यक . वस्तीचा बृहत आराखडा तयार करुन त्यानुसार तथा वस्तीच्या आवश्यकतेनुसार कामे घेण्यात येतात. लोकसंख्येच्या सुधारित निकषानुसार प्रत्येक दलित वस्तीला लोकसंख्येच्या प्रमाणात खालीलप्रमाणे अनुदान देण्यात येते.

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान रक्कम (लाखात ) |
|---|---|---|
| 1 | 10 ते 25 | 2.00 लाख |
| 2 | 26 ते 50 | 5.00 लाख |
| 3 | 51 ते 100 | 8.00 लाख |

| | | |
|---|---|---|
| 4 | 101 ते 150 | 12.00 लाख |
| 5 | 151 ते 300 | 15.00 लाख |
| 6 | 301 च्या पुढे | 20.00 लाख |

- **मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने**

योजनेचे स्वरुप

प्राथमिक व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकाचे उत्पन्न लक्षात न घेता सर्व पातळीवर शिक्षण फी परीक्षा फी इ. 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी वार्षीक रु. 415/- प्रमाणे देण्यात येते. ज्याची प्रतिपुर्ती शाळांना करण्यात येते.

नियम , अटी व पात्रता इ.

1. विद्यार्थी हा अनुसुचित जाती , अनुसुचित जमाती आणि वि.जा.भ.ज. प्रवर्गातील असावा .
2. विद्यार्थ्यांचे पालक हे महाराष्ट्राचे रहीवासी असावेत .

- **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती**

उदिदष्ट – इ.5वी ते 10वी मध्ये शिकण घेत असणा-या पहिल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करणे.
शासननिर्णय – सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासननिर्णय क्र.इबीसी-2003/प्र.क्र.466/मावक-2 दि.9.2.2007

योजनेचे स्वरुप-

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्या त्या माध्यमिक शाळांमधील 5 वी ते 10 वीच्या प्रत्येक ईयत्तेमधून पहिला व दुसरा असे प्रत्येकी दोन विद्यार्थी याप्रमाणे ही शिष्यवृत्ती दिली जाते. इ. 5 वी ते 7 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 50/- प्रमाणे 10 महिनेसाठी 500/-रु. व 8 वी ते 10 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 100/- प्रमाणे 10 महिनेसाठी 1000/- रुपये दिली जाते.

नियम , अटी व पात्रता इ. -

विद्यार्थी हा मागासवर्गीय अनु. जाती ,विजाभज, विमाप्र, अनु. जमाती प्रवर्गातील असावा. 50 % पेक्षा जास्त गुण घेवुन ऊत्तीर्ण झालेला असावा. विद्यार्थ्याची नियमित हजेरी व समाधानकारक प्रगती व चांगली वत्रणुक असावी .

| **इयत्ता** | **शिष्यवृत्ती दर** | **कालावधी** | **रुपये** |
|---|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु. 50/- दरमहा | 10 महिने , जुन ते मार्च | 500/- |
| 8 वी ते 10 वी | रु. 100/- दरमहा | 10 महिने , जुन ते मार्च | 1000/- |

- **अस्वच्छ व्यवसाय करणार्या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती**

योजनेचे स्वरुप

सदर योजनेत अस्वच्छ व्यवसायात काम करणार्या पालकांच्या दोन अनिवासी पाल्यांना इ. 1 ली व 2 रीसाठी रु. **225/-** दरमहा व तदर्थ अनुदान रु 750/- तसेच 3 री ते 10 वी वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 225/- दरमहा व तदर्थ अनुदान 750/- दिले जाते .वसतिगृहात राहणाऱ्या इ. 3 री ते 10 वी दरमहा रु. 700/- व तदथ्र अनुदान रु. 1000/- दिले जाते .

नियम , अटी व पात्रता इ.

या योजनेत मुलांचे पालक हे कातडी कमावणे , कातडी सोलणे , मैला सफाई करणे व कचरा कागद गोळा करणे यासारखे अस्वच्छ व्यवसाय करणे आवश्यक आहे. ही शिष्यवृत्ती सर्व जाती व धर्माला लागु आहे

- **सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना**

शासननिर्णय – 1. सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य, क्रिडा वि. स. विभाग क्रं.इबीसी-1094/32038/प्र.क्र.90 मावक-2 दि.12.1.1996

2.इबीसी-1094/32038/प्र.क्र.90 मावक-2 दि.12.1.1996

3.इबीसी-1094/32038/प्र.क्र.90 मावक-2 दि.12.1.1996

4.इबीसी-1094/32038/प्र.क्र.90 मावक-2 दि.12.1.1996

योजनेचे स्वरुप -

इ. 5 वी ते 7 वी मध्ये शिकणा-या व इ. 8 वी ते 10 वी मध्ये शिकणा-या अनु. जातीच्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उददेशाने अनु. जाती, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यर्थिनींना अनुक्रमे सन 1996 व 2003 पासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे.

| अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | 5 वी ते 7 वी | दरमहा रु. 60/-प्रमाणे रु. 600/- (sc/sbc/vjnt )<br>दरमहा रु. 250/-प्रमाणे रु. 2500/- (obc ) | 10 महिने |
| 2 | 8 वी ते 10 वी | दरमहा रु. 100/-प्रमाणे रु. 600/- (sc)<br>दरमहा रु. 300/-प्रमाणे रु. 3000/- (sbc/vjnt obc ) | 10 महिने |

नियम , अटी व पात्रता इ.

1. उत्पन्न व गुणाची अट नाही.

2.संबंधितशाळेच्यामुख्याध्यापकांनीविद्यार्थ्यांचेअर्जऑनलाईनभरणेआवश्यक आहे .

3. 75 % उपस्थिती असल्यास शाळेने प्रस्ताव विहीत कालावधीत सादर करावा.

4. लाभधारक मुलगी शासनमान्य शिक्षण संस्थेत नियमित शिकत असावी. सदर शिष्यवृत्तीची रक्कम त्या त्या मुलींच्या बँकेतील खात्यामध्ये /ऑनलाईन जमा करण्यात येते.

- **इ. 9 वी व 10 वी मध्ये शिकत असलेल्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपूर्वशिष्यवृत्ती**

योजनेचे स्वरुप

अनु. जातींच्या विद्यार्थ्यांचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उदेश्याने केंद्र शासनाने दि. 1 जुलै 2012 पासून इ. 9 वी व 10 वी मध्ये शिकत असणार्या अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकपर्व शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे.

| अ.क्र. | योजना | वसतिगृहात न राहणारे (अनिवासी) | वसतिगृहात राहणारे (निवासी) |
|---|---|---|---|
| 1 | शिष्यवृत्तीचे दर (प्रतिमहा) | रु. 250/- | रु. 550/- |
| 2 | पुस्तके व अनुदान (वार्षिक) | रु. 750/- | रु. 1000/- |

नियम , अटी व पात्रता इ.

1. सदर योजना शासकीय मान्यताप्राप्त शाळेत शिकत असणार्या विद्यार्थ्यांसाठी लागु राहील.
2. सदर योजने अंतर्गत शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याच्या पालकाची उत्पन्न मर्यादा रु 2.00 लक्ष इतकी असावी.
3.यामध्ये विद्यार्थ्यास किमान गुणाची अट नाही.
4. सदर योजनेतंर्गत विद्यार्थ्यांने अर्ज करणे आवश्यक आहे.सदर योजनेचा लाभ केंद्गाच्या इतर माध्यमिक पूर्व शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांना लागु राहणार नाही.

- **आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन व अर्थसहाय्य**

1) सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागशासन निर्णय क्र. युटीए-1099/प्रक्र.45/मावक-2 दि. 30 जानेवारी 1999
2) सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागशासन निर्णय क्र.आंजावि-2007/प्रक्र.191/मावक-2 दि. 1 फेब्रुवारी 2010

योजनेचे स्वरुप.

समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी ही योजना राबविली जाते. यामध्ये अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती,विमुक्त जाती वभटक्या जमातीच्या व्यक्तीपैकी एक व्यक्ती व दुसरी व्यक्ती सवर्ण हिंदु, जैन,लिगाईत, बौध्द, शीख यामधील असावा. तसेच मागासवर्गीय अनु. जाती व जमाती , विजाभज यामधील आंतर प्रवर्गातील आंतरजातीय विवाहीतांनाही याचा लाभ दिला जातो. जिल्हा समाजकल्या अधिकारी जिल्ह परिषद यांचेकडे या अर्थसहाय्या करीता प्रस्ताव सादर करावा. या योजनेअंतर्गत प्राप्त होणारे प्रस्ताव त्या त्या वर्षामध्ये निकानी काढणे अवश्यक राहील. या करीता सर्व जिल्हा समाजकल्या अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्राप्त झालेले प्रस्ताव हे वर्षातून दोन वेळा निकाली काढणे अवश्यक राहील. माहे सप्टेंबर व माहे मार्च या दोन वेळा निकाली काढण्यात यावेत. याकरीता एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत प्राप्त झालेले प्रस्ताव हे सप्टेंबरच्या शेवटच्या आठवडयात समारंभपूर्वक निकाली काढावेत व ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्राप्त झालेले प्रस्ताव मार्च महीण्यात 8 मार्च या महीला दिनी समारंभपूर्वक निकाली काढावेत.

वरील प्रमाणे अटी व शर्तीच्या अधिन राहुन दिनांक 1 फेब्रुवारी 2010 नंतरच्या विवहीत जोडप्यांना रक्कम रु. 50000/- एवढे अर्थसहाय्य त्यांच्या संयुक्त बँक खात्यात वर्ग केले जाते.

नियम , अटी व पात्रता इ.

तसेत कोणत्याही लाभधारकांनी या योजनेचा दोन वेळा लाभ घेऊ नये यासाठी लाभधारकांनी सादर केलेल्या (अ) विवाह नोंदनी दाखला (ब) वर/वधू यांचा शाळा सोडल्याचा दाखला व (क) वर/वधू यांच्या जातीच्या दाखल्यावर मुळ प्रतीच्या मागील बाजूस अतंरजातीय विवाह प्रत्सोहनपर अनुदान देण्यात आलेले आहे असा रब्बरी शिक्का मारण्यात यावा. सर्व समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद यांनी त्यांच्या कार्यालयात परिशिष्ट 'ड' येथे नमूद केल्याप्रमाणे नोंदवही नमुन्यात माहिती ठेवावी.

- **मागासवर्गीय वसतिगृहांना परिपोषण अनुदान प्रदाने -**

योजनेचे स्वरुप

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांचा शिक्षणक्रम पुर्ण करता यावा , ग्रामीण भागात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे , आर्थीक दुरावस्थेमुळे पालकांना मुलांच्या शिक्षणात अडचणी येवु नयेत व विद्यार्थ्यांचा शैक्षणीक विकास व्हावा या उददेशाने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

समाज कल्याण विभाग , जिल्हा परिषद , परभणी अंतर्गत एकुण 67 वस्तीगृहे कार्यरत असून एकुण 3142 विद्यार्थ्यांचे निवास/भोजनाचा विनामुल्य सोय केली जाते. यासाठी शासनामार्फत स्वयंसेवी संस्थांना प्रति विद्यार्थी रु 1500 /- प्रमाणे अनुदाने दिले जाते व अधिक्षक यांना रु. 10000/- , स्वयंपार्कीना 8500/- , मदतनीस 7500 /-, पहारेकरी यांना रु. 7500/- असे प्रतिमहा मानधन अदा केले जाते. इमारत भाडयापोटी , सा.बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाडयाच्या 75 % अनुदान संस्थेस देण्यात येते.

नियम , अटी व पात्रता इ.

अ) विद्यार्थ्यी मागासवर्गीय प्रवर्गातील असावा. (विहित टक्केवारी नुसार प्रवेश )

आ) 5 वी ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल.

इ) वसतिगृह प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड असणे आवश्यक.

ई) विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा

- **इयत्ता 5 वी ते 10 मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या मुलींना सावित्रिाबाई फुले शिष्यवृत्ती योजना**

विजाभज व विमाप्र मुलींमध्ये शिक्षणाची आवड निर्माण व्हावी , मुलींचे शाळेतली गळतीचे प्रमाण कमी व्हावे तसेच शिक्षणासाठी आर्थीक सहाय्य व्हावे यासाठी ही योजना राबविली जाते .

**योजनेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | 5 वी ते 7 वी | दरमहा रु. 60/-प्रमाणे रु. 600/- | एकुण 10 महिने |
| 2 | 8 वी ते 10 वी | दरमहा रु. 300/-प्रमाणे रु. 3000/- | एकुण 10 महिने |

**योजनेच्या अटी व शर्ती :-**

1. विद्यार्थिनी विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावी .
2. लाभधारक मुलगी शासनमान्य संस्थेमध्ये नियमित शिकत असावी .
3. उत्पन्नाची अट नाही .
4.

- **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रीकपुर्व गुणवत्ता शिष्यवृत्ती**

योजनेचे स्वरुप

विजाभज व विमाप्र प्रवगा्रतील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्या त्या माध्यमिक शाळांमधील 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थी यांना शिष्यवृत्ती दिली जाते.इ. 5 वी ते 7 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 20/- प्रमाणे 10 महिनेसाठी 200/-रु. व 8 वी ते 10 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 40/- प्रमाणे 10 महिनेसाठी 400/- रुपये दिली जाते.

नियम , अटी व पात्रता इ.

विद्यार्थी हा विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा. 50 % पेक्षा जास्त गुण घेवुन ऊत्तीर्ण झालेला असावा. विद्यार्थ्याची नियमित हजेरी व समाधानकारक प्रगती व चांगली वत्रणुक असावी .

| **इयत्ता** | **शिष्यवृत्ती दर** | **कालावधी** | **रुपये** |
|---|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु. 50/- दरमहा | 10 महिने | 500/- |
| 8 वी ते 10 वी | रु. 100/- दरमहा | 10 महिने | 1000/- |

- **दिव्यांग शाळा**

परभणी जिल्हयामध्ये समाज कल्याण विभागातील एकुण 32 अनुदानित शाळा कार्यरत आहेत.

| **अ.क्र.** | **शाळेचा प्रकार** | **प्रवर्ग** | **एकुण शाळा** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|---|---|---|
| 1 | अनुदानित शाळा | अस्थिव्यंग | 22 | 660 |
| | | मुकबधिर | 06 | 370 |
| | | मतिमंद | 06 | 170 |
| एकुण | | | 34 | 1210 |

- **अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बिजभांडवल योजना**

योजनेचे स्वरुप

अपंगांना स्वतःच्या पायावर उभे राहुन स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतिशील घटक म्हणून जगता यावे यासाठी अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बिज भांडवल योजने अंतर्गत प्रकल्प खर्चाच्या 20 टक्के एवढी रक्कम अथवा कमाल रुपये 30,000/- सबसिडी अर्थसहाय्य अनुदान व 80 टक्के एवढी रक्कम बँकेकडून कर्जरुपात देणे.

नियम , अटी व पात्रता इ.

वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. 100000 /- व प्रकल्प खर्चाची मर्यादा रु. 150000/- आणि वयोमर्यादा 18 ते 50 वर्षे असावी . अपंगत्वाची टक्केवारी 40 % व त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहीवासी असावा .

- **शालांत पूर्व शिक्षण घेण्यार्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना**

योजनेचे स्वरुप

अपंगांना स्वतःच्या पायावर उभे राहुन स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतिशील घटक म्हणून जगता यावे यासाठी आवश्यक ते असलेली शैक्षणिक पात्रता प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य त्या अपंगांना राज्य शासन शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित आहे.सदरील शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | इयत्ता | शिष्यवृत्ती दर |
|---|---|---|
| 1 | इयत्ता 1 ली ते 4 थी (कर्णबधीर पायरी वर्गापासुन ) | दरमहा रु. 100/- |
| 2 | इयत्ता 5 वी ते 7 वी | दरमहा रु .150/- |
| 3 | इयत्ता 8 वी ते 10 | दरमहा रु . 200/- |
| 4 | मतिमंद मानसिक विकलांग | दरमहा रु. 150/- |
| 5 | अपंग कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी | दरमहा रु. 300 /- |

नियम , अटी व पात्रता इ.

अपंग विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. अपंगत्वाची टक्केवारी 40 % व त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. विद्यार्थि एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा .

- **शालांत परीक्षेत्तर (मॅट्रीकोत्तर ) शिक्षण घेण्यार्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजना**

योजनेचे स्वरुप

अपंगांना स्वतःच्या पायावर उभे राहुन स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतिशील घटक म्हणून जगता यावे यासाठी आवश्यक ते असलेली शैक्षणिक पात्रता प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य त्या अपंगांना राज्य शासन शिष्यवृत्ती योजना कार्यान्वित आहे.सदरील शिष्यवृत्तीचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | गट | वसतिगृहात राहणारे | वसतिगृहात न राहणारे |
|---|---|---|---|
| 1 | गट- अ | दरमहा रुपये 1200/- | दरमहा रुपये 550/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | गट- ब | दरमहा रुपये 820/- | दरमहा रुपये 530/- |
| 3 | गट- क | दरमहा रुपये 820/- | दरमहा रुपये 530/- |
| 4 | गट- ड | दरमहा रुपये 570/- | दरमहा रुपये 300/- |
| 5 | गट- इ | दरमहा रुपये 380/- | दरमहा रुपये 230/- |

त्याचबरोबर निर्वाह भत्ता ,सक्तीचे शुल्क , अभ्यासदौरा , वाचकभत्ता व प्रकल्प खर्च इ. देण्यात येतात.

नियम , अटी व पात्रता इ.

अपंग विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. अपंगत्वाची टक्केवारी 40 % व त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. विद्यार्थि एकाच इयत्तेत दोन वेळा नापास झालेला नसावा .

- **अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना**

योजनेचे स्वरुप

आंतरजातीय विवाहाच्या धर्तीवर अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याच्या योजनेंतर्गत अर्थसहाय्य ही योजना सुरु करण्यात आली आहे. अपंग व अव्यंग विवाहीतांना प्रोत्साहन देण्याची ही योजना किमान 40 % किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तीशी अपंगत्व नसणार्या सुदृढ व्यक्तीने विवाह केल्यास त्या जोडप्यास सदर योजना लागू राहील. सदर जोडप्यास 50000/- रुपये प्रोत्साहनपर अनुदान खालीलप्रमाणे दिले जाते .

अ) रक्कम रुपये 25,000/- चे बचत प्रमाणपत्रा

आ) रुपये 20,000/- रुपये रोख स्वरुपात

इ) रुपये 4500/- संसार उपयोगी साहीत्य/ वस्तु खरेदीसाठी देण्यात येईल .

ई) रुपये 500/- स्वागत समारंभाच्या कार्यक्रमाचा खर्च करण्यासाठी देण्यात येतो .

नियम , अटी व पात्रता इ.

विवाहाच्या एका वर्षाच्या आतच या योजनेचा लाभ लाभार्थ्यांना घेता येईल. अपंगत्वाची टक्केवारी 40 % व त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

- **अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने , उपकरणे पुरविणे योजना**

योजनेचे स्वरुप

अपंगांना स्वतःच्या पायावर उभे राहुन स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतिशील घटक म्हणून जगता यावे तसेच त्यांचे शारिरीक , मानसिक , सामाजिक व आर्थिक पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने त्यांना कृत्रिम अवयव व साधने , उपकरणे पुरविणे ही योजना राबविली जाते . अस्थिव्यंग अपंग व्यक्तींना तीन चाकी सायकल , कृत्रिम अवयव , कुबडया , कॅलीपर्स इ. साधने अंध व्यक्तींना चष्मा ,काठया , इ.10 वी पुढील अंध व्यक्तींना शिक्षणासाठी टेपरेकॉर्डर ,कर्णबधीरांसाठी श्रवणयंत्रा इ. साठी रुपये 3000/- पर्यंतचे अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे .

- **अनुसुचित जातीच्या मुलामुलींसाठी आश्रमशाळा योजना**

## योजनेचे स्वरुप

स्वंयसेवी संस्थे मार्फत चालविण्यात येणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुला व मुलींसाठी अनुदानीत आश्रमशाळाना सहाय्यक अनुदान.

1) शासन निर्णय क्र. अजाअ-1099/प्रक्र.389/मावक-2 दि. 29 मे 1999

महाराष्ट्र शासनाने सामाजिक न्याय विभागा अंतर्गत 1996-97 पासून अनुसुचित जातीच्या मुलामुलींसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत आश्रमशाळा राबवण्या बाबतचा निर्णय घेतला असून ज्या जिल्हयांमध्ये अनु. जाती व नवबौध्द यांचे प्रमाण जास्त आहे. त्या जिल्हयांमध्ये सदर योजना ही स्वयंसेवी संस्थांमार्फत राबवली जात असून त्यापैकी परभणी जिल्हयात एकुण अनुसुचित जातीच्या दोन आश्रमशाळा असून त्या पुढीलप्रमाणे

- वसंत अनुसुचित जाती प्राथमिक आश्रमशाळा , कारेगांव ता. परभणी जि. परभणी.
- वसंत अनुसुचित जाती माध्यमिक आश्रमशाळा , कारेगांव ता. परभणी जि. परभणी.

प्राथमिक आश्रमशाळेत 140 निवासी विद्यार्थ्यांना मान्याता असून माध्यमिक शाळेत 120 निवासी विद्यार्थ्यी मान्यता आहे.शासनाने ठरवलेल्या आकृतीबंधानुसार कर्मचार्यां ची पदे भरलेली आहेत.आश्रमशाळेतील निवासी विद्यार्थ्यांना मोफत निवास व भोजनाची व्यवस्था , मोफत शैक्षणिक साहित्य , आरोग्यविषयक सेवा , अंथरुण-पांघरुण तसेच वर्षाकाठी गणवेशाचे दोन संच इ. पुरवले जाते.

सदर खर्चाबाबत शासनाकडुन स्वयंसेवी संस्थांना प्राथमिक शाळेतील निवासी विद्यार्थ्यांसाठी प्रती विद्यार्थी रु. 1500 दरमहा 11 महिन्यासाठी व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 10 महिन्यांकरीता परिपोषण अनुदान दिले जाते. तसेच एकुण इमारत भाडे मुल्यांकनाच्या 75% इमारत भाडे दिले जाते

## नियम , अटी व पात्रता इ.

- प्रत्येक वर्गात मान्य निवासी संख्येपैकी 5 % विद्यार्थी हे अनुसुचित जमाती व विजाभज या प्रवर्गातील असतील.
- 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येईल
- आश्रमशाळा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड असणे आवश्यक.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा .

| अ.क्र. | इयत्ता | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 1 | 1 ली | 20 |
| 2 | 2 री | 20 |
| 3 | 3 री | 20 |
| 4 | 4 थी | 20 |
| 5 | 5 वी | 20 |
| 6 | 6 वी | 20 |
| 7 | 7 वी | 20 |

वरील प्रमाणे पहिली ते सातवी पर्यंत पूर्ण विकसीत आश्रमशाळेत 140 निवासी विद्यार्थी प्रवेशित राहतील.या आश्रम शाळेत प्रत्येक वर्गात 1 विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या 2 अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यासाठी प्रत्येकी 5% जागा

आरक्षित राहतील.ज्यादा प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्या करीता कोणतेही प्रकारची तुकडी वाढ किंवा जादा शिक्षकांच्या संख्येला मान्यता दिली जाणार नाही.

**मान्य शिक्षक संख्या :-** वर नमूद केल्या प्रमाणे एका वर्गात कोणत्याही परिस्थीतीत निवासी व अनिवासी असी मिळूण 60 पेक्षा अधिक विद्यार्थी राहणार नाहीत या विद्यार्थी संख्येसाठी एका वर्गात एक शिक्षक मंजुर केला जाईल.**निवासी शाळा सुरु करतांना इयत्ता पहिलीसाठी एक शिक्षक व निवासी** विद्यार्थ्यासाठी काळजी घेण्यासाठी एक अधिक्षक मजुंर असावे. त्यापुढील प्रत्येक प्रवर्गासाठी नैसर्गीक वाढीप्रमाणे 1 – 1 शिक्षक मजुंर असावा. इयत्ता पहिली चौथी पूर्ण झाल्यानंतर एक मुख्याध्यापकाचे पद असावे अशा प्रकारे शिक्षकांचा व अधिक्षकांचा आकृत्तीबंध खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | इयत्ता | शिक्षक | अधिक्षक | मुख्याध्यापक |
|---|---|---|---|---|
| 1 | 1 ली | 1 | 1 | - |
| 2 | 2 री | 1 | - | - |
| 3 | 3 री | 1 | - | - |
| 4 | 4 थी | 1 | - | - |
| 5 | 5 वी | 1 | - | 1 |
| 6 | 6 वी | 1 | - | - |
| 7 | 7 वी | 1 | - | - |

संस्थेने शिक्षक नेमताना शाळा सोडून जानार नाही असे त्या शिक्षकाकडूंन हमीपत्र घेणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक वर्षात दुसऱ्या शाळेत गेल्यास किंवा शाळा सोडून गेल्यास अशा शिक्षकाकडून एका वर्षाची वेतन वसूल केली जाईल अशी आट हमीपत्रात अतंरभूत राहील.इयत्ता पाचवीचे वर्ग सुरु झाल्यानंर एक क्रिडा शिक्षक संस्थेत नेमावा लागेल.ज्या संस्थेच्या प्राथमिक माध्यमिक शांळाना मान्यता असेल त्या संस्थांना 1 ली ते 4 थीच्या वर्गाकरीता डी.एङ पदवी धारक व पाचवी ते पुढील वर्गा करीता बी.एङ पदवीधारक शिक्षक नेमावा लागेल.

शिक्षकाची शैक्षणिक पात्राता :-

1.मुख्याध्यापक :- एस.एस.सी, डी.एङ/ एच.एस.सी. डी.एङ किंवा कोणत्याही शाखेचा पदवीधर व बी.एङ 2. शिक्षक :- 1 ली ते चौथी एस.एस.सी, डी.एङ/ एच.एस.सी. डी.एङ अनिवार्य 3.अधिक्षक :- एस.एस.सी, डी.एङ/ एच.एस.सी. डी.एड अनिवार्य 4.इयत्ता 4 थी चे 7 वी च्या वर्गाकरीता तासीका तत्वावर एक कला शिक्षक व एक संगीत शिक्षक नेमणे संस्थेला बंधनकारक राहील. त्यास आठवडयातून दोन तास या तत्वावर प्रती तास रु. 60 या प्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील.

शिक्षकेत्तर कर्मचारी :- इयत्ता 1 ली ते 3 री पर्यंत निवासी आश्रमशाळेत एक स्वयंपाकीचे पद भरता येईल. इयत्ता 4 थी ते 7 वी इयत्तेसाठी एक मदतणीस नेमता येईल. इयत्ता पाचवी नंतर कामासाठी एक पद भरता येईल. हे सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी संस्थेने रोजनदारीवर नेमावे त्यांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे वेतनश्रेणी लागू राहणार नाही. मात्र त्यांना दरमहा

प्रत्येकी रुपये 1000/- इतके मानधन संस्थेस अनुज्ञय राहील. व त्या मानधनाची प्रतीपूर्ती शासना मार्फत संस्थेला करण्यात येईल.

- **मान्यवर वृध्द कलावंताना मानधन योजना**

**योजनेचे स्वरुप :** समाज कल्याण विभागामार्फत विविध कलांमध्ये निपुण अशा मान्यवर वृध्द कलावंतांना मानधन दिले जाते . पंचायत समिती स्तरावरुन प्रस्ताव मागविले जातात . त्यानंतर प्रस्तावांची छाननी करुन त्यातुन कलाकारांची निवड केली जाते . प्रत्येक वर्षी 60 लाभार्थ्यांची निवड निवड समितीमार्फत केली जाते.

| अ.क्र. | श्रेणी | लाभाची रक्कम |
|---|---|---|
| 1 | अ | 3150/- रु. |
| 2 | ब | 2700/- रु. |
| 3 | क | 2250/- रु. |

- **माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती**

योजनेचे स्वरुप :-मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे म्हणून त्या त्या माध्यमिक शाळांमधील 5 वी ते 10 वीच्या प्रत्येक ईयत्तेमधून पहिला व दुसरा असे प्रत्येकी दोन विद्यार्थी याप्रमाणे ही शिष्यवृत्ती दिली जाते. इ. 5 वी ते 7 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 50/- प्रमाणे 10 महिनेसाठी 500/-रु. व 8 वी ते 10 वीत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रतिमाह 100/- प्रमाणे 10 महिनेसाठी 1000/- रुपये दिली जाते.

नियम , अटी व पात्रता इ. :-विद्यार्थी हा मागासवर्गीय अनु. जाती , अनु. जमाती प्रवर्गातील असावा. 50 % पेक्षा जास्त गुण घेउन ऊत्तीर्ण झालेला असावा. विद्यार्थ्याची नियमित हजेरी व समाधानकारक प्रगती व चांगली वर्तणुक असावी .

| इयत्ता | शिष्यवृत्ती दर | कालावधी | रुपये |
|---|---|---|---|
| 5 वी ते 7 वी | रु. 50/- दरमहा | 10 महिने , जुन ते मार्च | 500/- |
| 8 वी ते 10 वी | रु. 100/- दरमहा | 10 महिने , जुन ते मार्च | 1000/- |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (तेरा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागातील मिळणा-या सवलतीच्या परवाना याची चालु वर्षाची तपशिलवार माहिती.

समाज कल्याण विभागाअंतर्गत अपंग कल्याण योजनेमध्ये अपंग व्यक्तीना मोफत बस परवाना देण्याची योजना आहे .

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (चौदा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागातील माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात माहिती प्रकाशीत करणे.

-----निरंक----

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (पंधरा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागाच्या कार्यालयातील उपलब्ध सुविधांचा तक्ता प्रसिध्द करणे.

| अ.क्रं | सुविधांचा प्रकार | वेळ | कार्यपध्दती | ठिकाण | जबाबदार व्यक्ती / कर्म |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कार्यालय प्रमुखांना भेटण्याची वेळ | 12.00 ते 01.00<br>3.00 ते 5.30 | प्रत्यक्ष | कार्यालय | -- |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (सोळा)

जिल्हा परिषद, परभणी येथील समाज कल्याण विभागातील शासकीय माहिती अधिकारी / सहाय्यक माहिती अधिकारी / अपिलीय अधिकारी यांची विस्तृत माहिती

**अ).शासकीय माहिती अधिकारी.**

| **अ.क्रं.** | **शासकीय माहिती अधिका-याचे नाव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता / फोन नं.e-mail** | **अपिलीय प्राधिकारी** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.आर.पी.काळे | कार्यालयीन अधिक्षक | समाज कल्याण विभाग | जिंतुर रोड, परभणी dswozpparbhani@gmailcom | जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| | | | **ब).सहाय्यक माहिती अधिकारी** | | |
| **अ.क्रं.** | **सहायक माहिती अधिका-याचे नाव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता / फोन नं.e-mail** | |
| 1 | शाखाप्रमुख | - | समाज कल्याण विभाग | जिंतुर रोड, परभणी dswozpparbhani@gmailcom | |
| | | | **क).अपिलीय अधिकारी** | | |
| | | | | | |
| **अ.क्रं.** | **अपिलीय अधिका-याचे नाव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता / फोन नं.e-mail** | **यांच्या अधिनिस्त अधिकारी** |
| 1 | श्रीमती एस.के.भोजने | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | समाज कल्याण विभाग | जिंतुर रोड, dswozpparbhani@gmailcom | कार्यालयीन अधिक्षक |

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ख) (सतरा)

सर्वसाधारणपणे आपल्या कार्यालयाकडुन प्रशासकीय /आर्थिक कामाकाजाबाबत दरवर्षी प्रसिध्द करावयाची प्रकाशने

----निरंक---